आरती श्री विश्वजीवन ग्रंथाची

आरती विश्वजीवनाची । आत्मरूपी नंगेनाथाची

चराचरी विश्वी जो भरला । तोचि तूं डव्हेगावी आला
भक्ता धर्म पाळण्याला । सगुण रूपे अवतरला
करुनि कृपा । नाशण्या पापा । ग्रंथ हा सोपा
आली तुज दया दुःखितांची । आत्मरूपी नंगेनाथाची ।। आरती ।।१।।

स्वयं बोध जीवनाचा । भाव कथिला जीवाचा
साधु संत वैराग्याचा । संसारी महिमा सद्‌गुरूचा
पटवूनि सर्व । हटविला गर्व । दाविली ठेव
भक्ति करणारांची । आत्मरूपी नंगेनाथाची ।। आरती ।।२।।

विश्वजीवन ग्रंथासी । समजण्या सोप्या भाषेंसी
दुःखी जना सुखी करण्यासौ । तारण्या सकळ जीवासी
तुझा अवतार । उघडिलेज् द्वार । सुखाचे सार
व्यवस्था करुनि भक्ताची । आत्मरूपी नंगेनाथाची ।। आरती ।।३।।

सेवा भक्ति करी जो जैसा । भक्ति-परी फळ देसी तैसा
भक्ता आवडसी प्राणेशा । दुष्ट दंडण्या यमचि जैसा
असा तुझा न्याय । नसेचि अन्याय । सदा तव पाय
हृदयी धरण्यांची । आत्मरूपी नंगेनाथाची ।। आरती ।।४।।

नंगेस्वामी विश्वनाथा । शरण आलो चरणी माथा
अंत नका पाहू आता । पारायण भावे करिता
हरावे दुःख । मिळावे सुख । मनासी हरिख
मागणी विश्वनाथाची । आत्मरूपी नंगेनाथाची ।। आरती ।।५।।